असा. क्र. ३३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, फेब्रुवारी १८, २००८ / माघ २९, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ फेब्रुवारी २००८

**आदेश**

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००६/प्र.क्र.५०२/म-१.—ज्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ६९ च्या तरतुदीन्वये करण्यात आलेले मुंबई मुद्रांक (महसूल मुद्रांकांच्या विक्रीवर डाक विभागाला कमिशन देणे) नियम, २००४ यामध्ये सुधारणा करण्यासाठी, आणि उक्त अधिनियमाच्या कलम ६९ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाखाली पूर्व प्रसिद्धी बाजूला सारून तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे ;



[ **किंमत** : रुपये १०.०० ]

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ६९ चे पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) चे खंड (ब) व (क) आणि पोट-कलम (३) चे परंतुक याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, मुंबई मुद्रांक (महसूल मुद्रांकांच्या विक्रीवर डाक विभागाला कमिशन देणे) नियम, २००४ यामध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, मुंबई मुद्रांक (महसूल मुद्रांकांच्या विक्रीवर डाक विभागाला कमिशन देणे) (सुधारणा) नियम, २००८ असे म्हणावे.

२. मुंबई मुद्रांक (महसूल मुद्रांकांच्या विक्रीवर डाक विभागाला कमिशन देणे) नियम, २००४ ला जोडलेल्या अनुसूचीमध्ये, नोंद क्रमांक ३ ऐवजी पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

" ३. दिनांक १ जानेवारी २००८ ते ३१ डिसेंबर २००८ " १० टक्के. ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. रा. माळी,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 18th February 2008

### Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. Mudrank. 2006/C.R.502/M1.—Whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action to amend the Bombay Stamps (Payment of Commission to the Department of posts on sale of Revenue Stamps) Rules, 2004, framed under the provisions of section 69 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958) (hereinafter referred to as " the said Act "), and to dispense with the condition of previous publication under the proviso to sub-section (*3*) of section 69 thereof;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clauses (*b*) and (*c*) of sub-section (*2*) read with the proviso to sub-section (*3*) of section 69 of the said Act, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules to amend the Bombay Stamps (Payment of Commission to the Department of posts on sale of Revenue Stamps) Rules, 2004, as follows, namely :—

1. These rules may be called the Bombay Stamps (Paymet of Commission to the Department of posts on sale of Revenue Stamps) (Amendment) Rules, 2008.

2. In the Schedule appended to the Bombay Stamps (Paymet of Commission to the Department of posts on sale of Revenue Stamps) Rules, 2004 for entry 3, the following entry shall be substituted, Namely :—

" 3. 1st January 2008 to 31st December 2008. 10 per cent.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. R. MALI,
Joint Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई